आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – संध्या ७.०० वाजता

९ ऑक्टोबर २०२३ –सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात आणखी २५ जिल्हा रुग्णालय सुरू करण्याचा राज्य सरकारचा निर्णय
- आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर शुक्रवारी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात एकत्र सुनावणी, विधानसभा अध्यक्षांनाही नोटीस
- शरद पवारांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये लोकशाहीचं पालन झालं नसल्याचा अजित पवार गटाचा केंद्रीय निवडणूक आयोगासमोर पुनरुच्चार

**आणि**

- राज्यातल्या बहुतांश भागातून नैऋत्य मौसमी पावसाची माघार

**<><><><><>**

राज्यात आणखी २५ ठिकाणी जिल्हा रुग्णालय सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत राज्यातल्या आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. त्यात आरोग्य विभागाला दिलेला निधी वाढवण्याचाही निर्णय झाला.

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

औषध खरेदी प्राधिकरणामार्फत औषध खरेदीचे आदेश दिल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यातल्या परळी वैजनाथ, घृष्णेश्वर आणि सप्तशृंगी देवी तीर्थक्षेत्रांच्या ५३१ कोटींच्या सुधारित आराखड्याला आज मान्यता मिळाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. परळी इथल्या वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिर विकासासाठी २८६ कोटी ६८ लाख रुपयांच्या सुधारित आराखड्याला मान्यता देण्यात आली आहे. वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासाचा मूळ आराखडा हा १३३ कोटींचा होता. मात्र, मंदिरात दगडी भिंती बांधून जीर्णोद्धार करणे, यात्री प्रतीक्षालय अशी एकूण ९२ काम असल्यानं कामांची किंमत वाढली आहे. या बैठकीत श्री क्षेत्र घृष्णेश्वर तीर्थक्षेत्राच्या सुधारित १६३ कोटी आणि श्री क्षेत्र सप्तशृंगी देवी या तीर्थक्षेत्राच्या ८१ कोटी ८६ लाखाच्या सुधारित आराखड्यालाही मान्यता देण्यात आली. इथे येणाऱ्या भाविकांना चांगल्या सोयीसुविधा देण्यासाठी जिल्हा प्रशासनानं दक्षता घ्यावी आणि परिसरात पर्यटनवाढीसाठी देखील प्रयत्न करावेत, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

<><><><><>

दसरा आणि नवरात्रोत्सव काळात मुंबईसह परिसरात महाराष्ट्र सरकारच्या नेतृत्वाखाली रामलीला कार्यक्रमाचं मुंबईत मोठ्या धुमधडाक्यात आयोजन करण्यात येणार असल्याचं मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी समाजमाध्यमातून सांगितलं आहे. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र रामलीला मंडळाच्या प्रतिनिधींसोबत मंत्री लोढा यांची बैठक झाली होती. त्या बैठकीत मुंबईत रामलीलाच्या आयोजनावेळी आजवर आलेल्या अडचणींवर तोडगा काढत, मुंबई महापालिकेला त्यांनी काही निर्देश दिले होते. त्यानुसार रामलीला कार्यक्रमासाठी एक खिडकी योजना तयार केली आहे. त्याचप्रमाणे मैदानाच्या भाड्यामध्ये ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय देखील घेतला आहे. रामलीला कार्यक्रमाच्या

परिसरात फिरत्या शौचालयसारख्या विविध सुविधा उपलब्ध केल्या जाणार असून, अग्निशमन सेवाही मोफत उपलब्ध होणार आहे.

**<><><><><>**

आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या याचिकेवर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात एकत्र सुनावणी होणार आहे. अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्ष वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप करणारी याचिका शरद पवार गटाकडून जयंत पाटील यांनी सादर केली आहे. त्यावर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. तेव्हा न्यायालयानं हे आदेश दिल्याची माहिती शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी दिले. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना नोटीस बजावली आहे.

**<><><><><>**

शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये लोकशाहीचं पालन झालं नाही याचा पुनरुच्चार अजित पवार गटानं आज केंद्रीय निवडणूक आयोगात झालेल्या सुनावणीत केला. पक्षाच्या गेल्यावर्षी झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनात तसंच नियुक्तींमध्ये लोकशाही मूल्यांचं पालन झालं नाही, असा दावा अजित पवार गटाचे वकील नीरज कौल यांनी केला. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालचा पक्ष हा मूळ राष्ट्रवादी काँग्रेस आहे आणि त्यांच्याचकडे सर्वाधिक सदस्यांचा पाठिंबा असल्याचा दावा या गटानं केला.

याप्रकरणी पुढची सुनावणी ९ नोव्हेंबरला होणार आहे, अशी माहिती शरद पवार गटाचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी दिली. त्यावेळी शरद पवार गटाचा युक्तीवाद सुरू होईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीचा सुधारित कार्यक्रम २५ ऑक्टोबरला सादर करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं दिले आहेत. मतदार यादी फेरतपासणीच्या संदर्भातला अहवाल देण्यासाठी आणखी दोन आठवड्यांचा अवधी देण्याची मुंबई विद्यापीठाची विनंती न्यायालयानं आज मान्य केली. मात्र पुन्हा मुदतवाढ देणार नसल्याचं स्पष्ट केलं.

<><><><><>

निवडणूक आयोगानं आज पाच राज्यांमधल्या विधानसभा निवडणुकांची घोषणा केली. राजस्थानमध्ये २३ नोव्हेंबरला मतदान होईल. मध्य प्रदेशमध्ये १७ नोव्हेंबरला, तेलंगणा मध्ये ३० नोव्हेंबरला, छत्तीसगढ मध्ये सात आणि १७ नोव्हेंबरला, तर मिझोराम मध्ये सात नोव्हेंबरला मतदान होणार आहे. या सर्व राज्यांमध्ये तीन डिसेंबरला मतमोजणी होणार असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी सांगितलं.

<><><><><>

अर्थशास्त्रासाठीचा नोबेल पुरस्कार यंदा अमेरिकी अर्थतज्ञ क्लॉडीया गोल्डीन यांना जाहीर झाला आहे. त्या हार्वर्ड विद्यापीठात प्राध्यापक आहेत. अर्थव्यवस्थेत महिलांचं योगदान आणि कमाई याविषयीच्या विस्तृत संशोधनाबद्दल गोल्डीन यांची निवड करण्यात आल्याचं यल स्वीडीश अकॅडेमी ऑफ सायन्सेस ने सांगितलं.

कृषीप्रधान अर्थव्यवस्थेकडून औद्योगीकीकरणाकडे जगाची वाटचाल होत असताना महिलांना घर संसाराच्या मर्यादा पडल्याने एकूण अर्थव्यवस्थेत त्यांच्या श्रमांचा सहभाग जवळ जवळ २०० वर्ष वाढलाच नव्हता. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला सेवाक्षेत्रात वाढ झाल्यानंतर महिलांच्या सहभागात वाढ झालेली दिसू

लागली, असा निष्कर्ष गोल्डीन यांच्या संशोधनाने मांडला आहे. महिला आणि पुरुषांच्या श्रममोजणीत तफावत असल्याचंही त्यांनी मांडलं.

सुमारे १० लाख डॉलर्स मूल्याचे हे पुरस्कार येत्या डिसेंबरमधे ऑस्लो आणि स्टॉकहोम शहरात समारंभपूर्वक प्रदान केले जातील. विजेत्यांना १८ कॅरेट शुद्धतेचं सुवर्णपदक आणि सन्मानपत्रही दिलं जातं.

<><><><><>

गुंतवणुकीसाठी भारत एक आदर्श ठिकाण असल्याचं केंद्रीय बंदरे विकासमंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी म्हटलं आहे. या महिन्याच्या 17 ते 19 तारखे दरम्यान मुंबईत होणाऱ्या जागतिक सागरी परिषदेच्या आगोदर मुंबईत आयोजित एका वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. केंद्र सरकानं गेल्या दशकभरात घेतलेल्या अनेक निर्णयांमुळे, विशेषता सागरमाला सारख्या प्रकल्पांमुळे भारताची मालवाहू हातळणी क्षमता अनेक पटींनी वाढली असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

भारतीय लष्करातले जवान पांडुरंग तावरे यांच्यावर बीड जिल्ह्यातल्या काकडहिरा इथल्या त्यांच्या मूळगावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. सिक्कीममध्ये तीस्ता नदीला आलेल्या पुरात तावरे आपलं कर्तव्य बजावत असताना वाहून गेले होते. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंढे यांनी तावरे कुटुंबाची भेट घेऊन त्यांचं सांत्वन केलं.

<><><><><>

लेखक हेरंब कुलकर्णी यांच्यावर अहमदनगर इथं  हल्ला करणाऱ्यांना तत्काळ अटक करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोलीस अधीक्षकांना दिले आहेत. शिंदे यांनी कुलकर्णी यांना फोन करून त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्स निर्देशांकांत आज ४८३ अंकांची घसरण झाली आणि तो ६५ हजार ५१२ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १४१ अंकांची घसरण नोंदवत १९ हजार ५१२ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावरची पुण्याकडे जाणारी वाहतूक उद्या दुपारी १२ ते दुपारी २ या वेळेत पूर्णत: बंद राहणार आहे. अमृतांजन पूल आणि पुणे वाहिनीवर खंडाळा बोगदा इथं हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत गॅन्ट्री उभारण्याचं काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत केलं जाणार आहे.

**<><><><><>**

नैऋत्य मोसमी पावसानं महाराष्ट्राच्या बहुतांश भागातून माघार घेतल्याची माहिती हवामान विभागानं आज दिली.

मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे. मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय घट झाली आहे. येत्या दोन दिवसात राज्यातलं हवामान कोरडं राहील, अशी शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**